Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 8 | Feb - 2016

डॉ. बाळासाहेब गुंजाळ यांचे समीक्षालेखन

डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक ,
मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

प्रस्तावना :

'वसंत बापट कवी आणि कविता', 'वसंत बापट-साहित्य आणि विचार', 'बापटांचे गद्य साहित्य-आशय आणि आस्वाद' अशी वसंत बापट यांच्या साहित्यावरील डॉ. बाळासाहेब गुंजाळ यांचे तीन समीक्षाग्रंथ अलिकडच्या काळात प्रसिद्ध झाले आहेत. प्रतिष्ठान, अनुबंध, म.सा.पत्रिका, आरती भालचंद्र, मयुरवृत्त अशा अनेक नियतकालिकांतून लेखक सातत्याने समीक्षालेखन करीत आहे. ते रसिक समीक्षक म्हणून सर्वांना परिचित आहेत. 'बापटांचे गद्य साहित्य-आशय आणि आस्वाद' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत द. ता. भोसले त्यांच्याविषयी म्हणतात, बाळासाहेब गुंजाळ आनंदयात्री समीक्षक आहेत. त्यांनी आपल्या प्रज्ञेला प्रतिभेची जोड दिली आहे व आपल्या व्यासंगाला रसिकतेची जोड दिली आहे व आपल्या समीक्षेला सौंदर्यदृष्टीची जोड दिली आहे आणि आपली संवेदनशीलता आनंदयात्री बापटाच्या संवेदनशीलतेशी जोडून घेतली आहे. अशा आनंदयात्री समीक्षकाचे तीनही ग्रंथ अनेक अर्थानी महत्त्वाचे आहेत.'



'वसंत बापट-कवी आणि कविता' हा ग्रंथ अक्षर मुद्रा प्रकाशन नाशिक यांच्याकडून २००६ साली प्रसिद्ध झाला आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची या ग्रंथाला प्रस्तावना लाभली आहे. एकूण पाच प्रकरणांत या ग्रंथाची विभागणी केली आहे. पहिल्या प्रकरणात वसंत बापटाचे व्यक्तिमत्त्व लेखकाने उलगडून दाखविले आहे. दुसऱ्या प्रकरणात वसंत बापटांच्या कवितेचा काव्यप्रवास सांगितला आहे. तिसऱ्या प्रकरणात वसंत बापटांच्या कवितेचे आशयाच्या दृष्टीने विवेचन केले आहे. प्रकरण चारमध्ये वसंत बापटांच्या काव्यशैलीविषयी चर्चा केली आहे व शेवटच्या पाचव्या प्रकरणात अभ्यासांती समारोप. एवढा प्रदीर्घ आणि सखोल असा अभ्यास ग्रंथरूपाने प्रकाशित होत आहे, हे आवर्जून नमूद करण्यासारखे आहे.

पहिल्या प्रकरणात वसंत बापटाचे व्यक्तिमत्त्वाचे अनेक पदर उलगडून दाखविले आहेत. नानासाहेब गोरे, बाळासाहेब खेर, साने गुरूजी, रावसाहेब पटवर्धन, यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई अशा नामवंताचा त्यांना लाभलेला सहवास, महाराष्ट्र शाहीर कलापथक यातून लोकशिक्षणाचे प्रभावीपणे केलेले कार्य, १९४२ चा क्रांती लढा, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन अशा सामाजिक लढ्यात असणारा सक्रिय सहभाग, पाकिस्तानच्या आक्रमणाच्या वेळी 'इंचइंच लढवू' हे त्यांनी लिहिलेले गीत व त्यातून निर्माण होणारी राष्ट्रीय भावना, समाजमनाशी साधला गेलेला संवाद, बालमनावर झालेले अभिजात संस्कृत वाङ्मयाचे संस्कार व त्यातून लयबद्ध रचनेचा लागलेला नाद, शाळा-महाविद्यालयात शिक्षण घेत असताना लाभलेले उत्तम शिक्षण त्यातून घडत गेलेले त्यांचे समाजसंमुख व्यक्तिमत्त्व शालेय जीवनातच सुरू केलेली पद्य रचना, १९४२ च्या चळवळीत घेतलेली उडी, बैलगाडीपासून ते विमानाने त्यांनी केलेला प्रवास, 'साधनां'चे संपादक म्हणून केलेले काम, प्रतिभावंत कवी, गद्य लेखक, संस्कृत व मराठीचे प्राध्यापक, स्वातंत्र्य सैनिक, शाहीरी कलापथकाचा निर्माता, अभिनेता,

दिग्दर्शक, तमासगीर, राष्ट्रसेवादलाचा कार्यकर्ता, उत्तम वक्ता, मुसाफिर, पत्रकार, कार्यक्रमाचा भाष्यकार– अशा कितीतरी क्षेत्रातील त्यांच्या चौफेर कार्यकर्तृत्वावर लेखकांनी प्रकाश टाकला आहे. त्यातून बापटांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू वाचकासमोर आले आहेत.

दुसऱ्या प्रकरणात वसंत बापटांच्या काव्यप्रवासाविषयी सविस्तर चर्चा केली आहे. बिजली, सेतू, अकरावी दिशा, सकीना, मानसी, प्रवासाच्या कविता, शिंग फुंकिले रणी, शूर मर्दाचा पोवाडा, मेघहृदय तेजसी राजसी, रशिया–अशा काव्याचा अभ्यास करून योग्य त्या ठिकाणी लेखकाने भाष्य केले आहे. सामाजिक विषमतेवर परखडपणे भाष्य करणारी बापटाची कविता त्यांच्या आंतरिक तळमळीतून कशी येते याविषयी लेखकाने लिहिले आहे. ते म्हणतात, 'बापटांची सामाजिक जाणीव प्रामाणिक आहे. तिच्यात क्वचित प्रचारकी थाट असला तरी त्यामागील तळमळ, भावना, जिव्हाळा महत्त्वाचा आहे. उत्कट भावनांचे व विचारांचे प्रामाणिक प्रकटीकरण आहे. त्यात दिखाऊपणा किंवा उसना अभिनिवेश नाही. आंतरिक निष्ठा, भावनिक जिव्हाळा आणि तीव्र आत्मप्रत्यय यांतून त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान प्रकट होते. प्रणयाच्या वेगवेळ्या छटा 'सेतू' या काव्यसंग्रहामधून दिसून येतात. प्रेयसीचा रूसवा, फुगवा, तिचे अवखळपणा, खट्याळपणा, विरहात होरपळणारे मन असा आविष्कार निसर्गाच्या पार्श्वभूमीवर साकार होतो. निसर्ग वर्णनाच्या आधारे बापट आपली प्रेमभावना व्यक्त करतात.'

नाट्यात्मकता, कथनपरता आणि नादमाधुर्य अशी 'सेतू' काव्यसंग्रहाची महत्त्वाची वैशिष्ट्ये ते सांगतात. त्याचबरोबर त्यांच्या काव्याच्या मर्यादाही सांगितल्या आहेत. त्यासाठी अनेक समीक्षकांची मते त्यांनी दिली आहेत. लावणी हे मराठी मनाचे आकर्षण ठरले आहे. लावणी ही प्रामुख्याने शृंगारप्रधान असते. असे असले तरीही समकालीन समाजजीवनाचे वास्तव लावणीत पाहावयास मिळते. अशी लावणी हे बापटांच्या रोमँटिक व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये त्यांच्या लावणीतही प्रकट झाली आहेत. स्त्री सौंदर्याचे अनेक बारकावे त्यांनी अतिशय सूचकपणे रेखाटले आहेत. बदलत्या आधुनिक जाणिवेचे सूचन त्यांच्या काही लावण्यांमधून होते. बापटांची लावणी मराठी मनाला मोह घालणारी आणि स्त्री देहाभोवतीच फिरणारी असली तरी लावणीचा बाज त्यांनी चांगला राखला आहे. बापटांच्या लावणीचे हे वर्णन करीत असताना लावणीची व्याख्या, तिची सुरूवात, मराठी मनाशी तिचा असणारा संबंध असे लावणी या वाङ्मयीन प्रकाराविषयी विवेचन करून त्यांनी बापटांच्या लावणीची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. अशाच पद्धतीचे विवेचन त्यांनी 'शूर मर्दाचा पोवाडा' या संदर्भात केला आहे. महाराष्ट्राच्या लोककलांवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. रामजोशी, होनाजी बाळा, अनंत फंदी, प्रभाकर, सगनभाऊ, परशराम, ग. दि. माडगूळकर इत्यादी नामवंत शाहिरांचा त्यांनी नामनिर्देश केला आहे. यामध्ये बापटांच्या पोवाड्याचे वेगळेपण त्यांनी सांगितले आहे. एवढेच नव्हे तर बापटाच्या शाहीरी काव्याची प्रेरणा जाणीवपूर्वक त्यांनी विस्ताराने दिली आहे, त्यात पोवाड्यातील काही महत्त्वाची अवतरणे दिली आहेत. ती अभ्यासकांना खूपच महत्त्वाची आहेत.

''नका भिऊ शेजाऱ्यांना मन हे विशाल,
तुम्ही राहावे खुशाल नाही लागायची मशाल,
कधी तुमच्या घरादाराला। वचन हे देतो तुम्हाला।
न्यायाची चाड आम्हाला। पण येऊन आमच्या सदनाला।
शिरजोर कधी कोण झाला। गय नाही व्हायची,
ते ठाऊक नाही रक्ताला ।।जी।।

मराठी माणसाच्या स्वभावाचे बापटांनी केलेले वर्णन लेखकाला खूपच अचूक वाटते. असा बापटांचा प्रदीर्घ काव्यप्रवास कालानुक्रमे मांडत असताना बापटांच्या कवितेचे सामर्थ्य ते तितक्याच सामर्थ्याने अधोरेखित करतात.

तिसऱ्या प्रकरणात सामाजिक कविता, राष्ट्रीय कविता, राष्ट्रीय गीते व पोवाडा, व्यक्तिचित्रात्मक कविता, निसर्ग कविता, लावणी असे भाग मानून आशयाच्या दृष्टीने अभ्यास केला आहे. आशयाच्या दृष्टीने लेखकांनी केलेली मीमांसा खूपच महत्त्वाची आहे. ते म्हणतात, सामाजिक कविता, राष्ट्रीय कविता, राष्ट्रीय गीते व पोवाडा, व्यक्तिचित्रात्मक कविता, निसर्ग कविता, लावणी अशी तिची विविध रूपे आहेत. त्यांची प्रतिभा कधी सामाजिक जाणीवा प्रकट करते तर कधी राष्ट्रीय भावना

आविष्कृत करते, प्रणयाची मनोहारिता रेखाटते, प्रेमरंगात रंगून जाते, निसर्गाच्या रंगरूपाने धुंद होते, पोवाड्यात शौर्यशाली बनते, लावणीत सुकुमार लावण्यवती होते. अशी तिची कितीतरी आशयसंपन्न व मनमोहक रूपे आहेत.

चौथ्या प्रकरणात आशयघन शब्दकळा, नादमाधुर्य व लयबद्धता, अलंकार व छंदप्रभुत्व, प्रतिमासृष्टी, प्रतिकात्मकता, नाट्यात्मकता, रसाविष्कार, उपहास-उपरोध असे घटक मानून बापटांच्या काव्यशैलीचे विशेष नोंदविले आहेत व शेवटच्या प्रकरणात लेखकांनी त्यांची महत्त्वाची मते नोंदविली आहेत.

'वसंत बापट-साहित्य आणि विचार' हा लेखकाचा आणखी एक महत्त्वाचा समीक्षा ग्रंथ. वसंत बापटांची कविता आणि तिचे वेगळेपण. वसंत बापटांचे बालसाहित्य, वसंत बापटांचा काव्यविचार, वसंत बापटांचा साहित्यविचार, वसंत बापटांचा भाषाविचार, वसंत बापट कलापथकाचा आधारवड, वसंत बापटांची जीवनदृष्टी, वसंत बापटांची मुलाखत-१, वसंत बापटांची मुलाखत-२, वसंत बापटाच्या असंग्रहीत साहित्याची सूची अशा एकूण दहा प्रकरणात या ग्रंथाची विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये वसंत बापटांचा साहित्यविचार या प्रकरणावर लेखकांनी दिलेले तपशील वाचकाच्या व अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. वसंत बापटांची कलामूल्ये व जीवनमूल्ये यांकडे त्यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. लेखक लिहितात, 'वसंत बापटांना सत्य, शिव, सुंदर, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, मांगल्य, ज्ञानाची उपासना या मूल्यांविषयी श्रद्धाभाव आहे. अशिव आणि असुंदर यांना उच्च स्थान देणारा माणूस किंवा समाज त्यांना दिसत नाही. जगातल्या कुठल्याही मानव समाजातल्या कथांत असत्याचा, अभद्रतेचा आणि आंतरिक कुरूपतेचे जय दाखविलेला दिसत नाही. म्हणून आपल्या आयुष्याच्या चिमुकल्या परिघात सत्य, शिव, सुंदराची जमेल तेवढी आराधना करावी हा त्यांचा श्रद्धेचा, जिव्हाळ्याचा विषय आहे. वसंत बापटांचा भाषाविषयक विचार लेखकांनी लिहिला आहे. वसंत बापटाच्या भाषाविषयक भूमिकेचे लेखकांनी विश्लेषण केले आहे ते असेः मातृभाषा ही आपल्या जन्मापासून जीवनाच्या अंतापर्यंत साथ देत असते. आज मराठी भाषेचा सर्व स्तरांवर अनादर होत आहे. मातृभाषेच्या अवहेलनेमुळे मराठी समाजाचे मराठी संस्कृतीचे प्रचंड नुकसान होत असल्याची वसंत बापटाची भावना लेखकांनी मांडली आहे. ग्रंथाच्या शेवटी लेखकांनी वसंत बापट यांच्या ज्या मुलाखती घेतल्या आहेत. त्यामध्ये लेखकांनी बापटांना मार्मीक प्रश्न विचारल्याने व बापटांनी त्यांची मनमोकळेपणानी उत्तरे दिल्याने बापटांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडला आहे.

'बापटांचे गद्य साहित्य-आशय आणि आस्वाद' हा लेखकाचा तिसरा समीक्षाग्रंथ. बापटांची प्रवासवर्णने, बापटांची व्यक्तिचित्रे, जिंकुनी मरणाला, विसाजीपंताची वीस कलमी बखर, राजकीय उपहास, बापटांचे आत्मकथन, ताणेबाणे, तौलनिक साहित्याभ्यास, मूलतत्त्वे आणि दिशा, बापटांचे असंग्रहित समीक्षा लेखन अशा एकूण सहा प्रकरणांत या ग्रंथाची विभागणी करण्यात आली आहे. प्रसिद्ध समीक्षक द. ता. भोसले यांची प्रस्तावना या ग्रंथास लाभली आहे.

मुळातच कवी बापटांचा पिंड हा कवीचा असल्याने त्यांनी पाहिलेल्या निसर्गाला एक वेगळे परिणाम लाभले आहे. स्वतःच निसर्ग बनून निसर्गाकडे पाहणाऱ्या या प्रतिभावंताचे प्रवासवर्णनाचे सामर्थ्य आणि सौंदर्य लेखकांनी तितक्याच रसिकतेने अधोरेखित केले आहे. बापटांची प्रवासवर्णने यावर आपले मत नोंदवताना लेखकांनी आणखी काही समीक्षकांची मते विचारात घेतली आहेत. त्यामुळे या समीक्षाग्रंथाला परिपूर्णता लाभली आहे. बापटांच्या प्रवासवर्णनाविषयी सर्वांची मते विचारात घेतल्यानंतर लेखक आपले भाष्य करतो. 'मनाली' चे वर्णन करताना वसंत बापटांच्या निवेदनाला विशेष असा बहर आलेला आहे. त्यांनी केलेले 'मनाली'चे चित्रण प्रत्यक्ष हिमालयाच्या कुशीत बर्फाची स्वप्ने पाहायला लावणाऱ्या मनालीहून सुंदर आहे. 'मनाली' चे चित्रण प्रत्यक्ष हिमालयाच्या कुशीत बर्फाची स्वप्ने पाहायला लावणाऱ्या मनालीहून सुंदर आहे. 'मनाली'ला बापटांनी 'मुग्धे' च्या रूपात बघितले आहे. त्यामुळे त्यांच्या निवेदनाला एक प्रकारचा लाडिकपणा, नखरा आणि डौल प्राप्त झाला आहे.

बापटांच्या गद्य विडंबनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये लेखकांनी सांगितली आहेत. त्याअगोदर श्री. कृ. कोल्हटकर, पु. ल. देशपांडे, राम गणेश गडकरी, चि. वि. जोशी इत्यादी विनोदी लेखकांच्या साहित्यकृतींचा लेखकांनी आवर्जून उल्लेख केला आहे. गंगाधर गाडगीळ, वि. आ. बुवा, रमेश मंत्री, बा. व. सामंत, बाळ गाडगीळ, जयवं दळवी, वसंत सबनीस, द. मा. मिरासदार, सुभाष भेंडे, डॉ. अ. वा. वरटी यांच्या विनोदी लेखनाचा उल्लेख लेखकांनी केला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर 'विसाजीपंताची वीस कलमी बखर' हा राजकीय उपहास कसा आहे ते लेखकांनी सांगितले आहे. यामध्ये बखरीच्या भाषेत शोभतील अशी त्यांची नावेही विसाजीपंताच्या वीस कलमी बखरीत येतात. शरदाजी पौवार, पाणीदार पौवारे, हिंमत बहाद्दर, सकलशूर शिरोमणी तिसरे सीवाजी राजे, वसंतदादाजी पाटीलबाबा, रावराणी प्रभावती, शंकर शर्मा बिन दयाळ शर्मा, केनिया

चवथीची चंद्रकोर, सरदारसाहेब बलराम जाखरजी, सिंहधर्मचारी कोल्हे, विखापरी प्रखर विखे, हर्याणदेश सिंव्हासनाचे पश्चिमाधिकारी देवीलाल दुलारे असे पारंपरिक राजकारणाचा उपहास करण्याऐवजी ऐतिहासिक बखरीचा वापर करून समकालीन भाषेचा वापर करून बापटांनी केलेला उपहास वाचकांना जवळचा वाटतो. यावर लेखकांनी नोंदवलेल मत असे– 'वसंत बापटांच्या व्यक्तिमत्त्वात कवी आणि विनोदी लेखक ही दोन्ही रूपे सामावलेली आहेत. बापटांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वामुळेच ही बखर अधिक खुमासदार झाली आहे. बखरीचा किंवा जुन्या वाङ्मयाचा आभास निर्माण करणारी 'विसाजीपंताची' (कवी वसंत बापटांची) भाषाशैली हा तिचा एक महत्त्वाचा विशेष आहे. या बखरीत खास असा बापटी ठसा आहे. गोडवा आहे. खट्याळ विनोदबुद्धी, धारदार उपहास, मार्मीक निरीक्षण आणि बखरीची अजोड शैली यांनी ढंगदार बनलेली 'विसाजीपंताची वीस कलमी बखर' म्हणजे वसंत बापटांच्या शैलीचा बिलंदर नमुना आहे.'

यातील बापटांचे आत्मकथन ताणबारे यावर लेखकाने मांडलेले मत खूप महत्त्वाचे आहे. ताणेबाणे हे बापटांचे आठवणीचे पुस्तक दैनिक लोकसत्ताच्या लोकरंग पुरवणीत १६ ऑगस्ट १९९८ पासून क्रमशः पद्धतीने 'विसरू म्हणता विसरेना' या सदराखाली प्रसिद्ध झाले आहे. रसिका वाचकांनी त्याला भरभरून दाद दिली होती. 'ताणेबाणे' हे आत्मचरित्र नाही तर अनुभवांची स्मरणसाखळी असल्याचे बापटांनीच म्हटले आहे. बापटांच्या या आठवणी व त्यावर लेखकांनी केलेले भाष्य अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. लेखक म्हणतात, 'काही निवडक आठवणींमुळे 'ताणेबाणे' ला कलात्मकता व रेखीवता लाभली आहे. 'ताणेबाणे' हे आत्मकथन वाचनीय आणि वेधक असून वसंत बापटांच्या बहुरूपी व्यक्तिमत्त्वाच्या अनेकविध पैलूंचे नेटकेपणाने दर्शन घडविणारे आहे. बापटांच्या काही आठवणींचा लेखक परिचय करून देतात व त्यांच्या आत्मकथनाची काही वैशिष्ट्ये सांगतात– त्यामुळे आपोआपच बापटांच्या व्यक्तिमत्त्वाची काही वैशिष्ट्ये वाचकाला आपोआप जाणवतात.

डॉ. बाळासाहेब गुंजाळ यांच्या तिन्ही समीक्षाग्रंथांतून वसंत बापटांच्या साहित्याचा वाचकांना परिपूर्ण परिचय होतो. लेखकाने आस्वादक भूमिकेतून केलेले वर्णन वाचकाची आस्था वाढवते. लेखकांनी बापटांच्या साहित्याची त्यांना जाणवलेली वैशिष्ट्ये सांगितल्याने बापटांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय वाचकांना आपोआपच होतो. सौंदर्यलक्ष्यी कवीमन, डोळस श्रद्धा, निकोप रसिकता, परंपरेचा अभिमान, बहुश्रुतता, जिज्ञासा, संवेदनशीलता आणि मिस्किल वाटाड्या अशी बापटांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये लेखकांनी सांगितली आहेत. ती खूपच महत्त्वाची आहेत. व्यासंग, रसिकता, सहृदयता यांचा मिलाफ गुंजाळ यांच्या या तिन्ही समीक्षा ग्रंथात झाला आहे. बापट हे कवी म्हणून जितके सशक्त तितके आहेत तितकेच ते गद्यलेखक म्हणूनही सशक्त आहेत. हे बाळासाहेब गुंज़ाळ यांनी समीक्षेद्वारे सिद्ध केले आहे. 'प्राध्यापक बापटांच्या व्यक्तिमत्त्वाइतकी उंची आणि प्राध्यापक बापटांच्या संवेदनशीलते इतकी उंची बाळासाहेब गुंजाळ यांनी गाठलेली असल्यामुळे या ग्रंथाला परिपूर्णता प्राप्त झाली आहे', हे द. ता. भोसले म्हणतात ते खरेच आहे.

संदर्भः–

1.संशोधन : स्वरुप आणि समस्या
2.निळी पहाट रा. ग. जाधव प्रज्ञा पाठशाला मंदिर वाई प्रथमावृत्ती 1978.